14 MAR 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संशोधन, अभ्यासक्रम बलस्थान

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; नॅक मूल्यांकनात चांगल्या कामगिरीचा विश्वास

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १३ : संशोधन, विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा, पर्यावरणपूरक परिसर, अभ्यासक्रम ही विद्यापीठाची बलस्थाने आहेत. त्यामुळे नॅक मूल्यांकनात विद्यापीठ चांगली कामगिरी करेल, असा विश्वास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केला. आज विद्यापीठात झालेल्या पार्श्वभूमीवर घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ''नॅक मूल्यांकन सोमवार (ता.१५) पासून सुरू होणार आहे. नव्या पद्धतीनुसार मूल्यांकन दोन टप्प्यात होते. पहिला टप्पा ७०० गुणांचा असून त्यामध्ये सांख्यिकी मूल्यांकन होते. यासाठी विद्यापीठाची सांख्यिकी माहिती नॅकच्या पोर्टलवर भरायची असते. हा टप्पा कोरोनापूर्वी पूर्ण झाला. लॉकडाउनमुळे मूल्यांकनाचा दुसरा टप्पा लांबला. मात्र सोमवारपासून (ता. १५) या तीनशे गुणांच्या गुणात्मक मूल्यांकनाला सुरुवात होणार आहे. तीन दिवस हे मूल्यांकन होणार आहे. पहिल्यांदा समितीचे विद्यापीठाकडून स्वागत केले जाईल. त्यानंतर मी नॅक समितीसमोर विद्यापीठाच्या माहितीचे सादरीकरण करेन. त्यानंतर प्रत्यक्ष मूल्यांकनाला सुरुवात होईल. यामध्ये समिती सदस्य विद्यापीठातील ५० टक्के अधिवाविभागांना प्रत्यक्ष भेट देतील. यातील २५ टक्के अधिविभागांची निवड ते स्वतः करतील. तर उर्वरित अधिविभाग विद्यापीठाने सुचवायचे असतात. अधिविभागाच्या कामकाजाच्या माहितीबरोबरच ते विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यांच्याशी संवाद साधतील. तीन दिवसांच्या परीक्षणानंतर निरोप समारंभाचा कार्यक्रम होईल. यावेळी त्यांचा अभिप्राय विद्यापीठाला देतील. तसेच मूल्यांकनाचा रिपोर्ट नॅक कार्यालयाला पाठवला जाईल. गेल्या दोन वर्षांपासून विद्यापीठाने या मूल्यांकनाची सर्व तयारी व्यवस्थित केली आहे. त्यामुळे नॅक मूल्यांकनात विद्यापीठाला अपेक्षित यश मिळेल.''

पत्रकार परिषदेला प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. एन. एस. देशमुख, डॉ. डी. आर. कामत, लेखापाल व्ही. टी. पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. अलोक जत्राटकर उपस्थित होते.

अशी आहे नॅक समिती

- अध्यक्ष : डॉ. जी. पी. शर्मा (राजस्थान)
- सचिव : डॉ. बी. आर. कौशल (बेंगलोर)

सदस्य

- डॉ.एस.ए.एच मौनिद्दून (प.बंगाल)
- डॉ.तरुण अरोरा (पंजाब)
- डॉ. सुनीलकुमार (दिल्ली)
- डॉ. हरिशचंद्र दास (मेघालय)

विद्यापीठाची बलस्थाने

- अभ्यासक्र
- अध्यापन, अध्ययन, मूल्यमापन पद्धत
- मुलभूत आणि पायाभूत संशोधन
- प्राध्यापकांचे सायटेशन्स.
- विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सोयीसुविधा.
- प्रशासकीय कामकाज.
- विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी चालवलेले उपक्रम.
- पर्यावरणपूरक परिसर, पाण्याच्या बाबतीतील स्वयंपूर्णता.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 MAR 2021 तरुण भारत

विद्यापीठ 'ए प्लस' मानांकन मिळवण्यासाठी सज्ज

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : नॅक मुल्यांकनासाठी जोरदार तयारी : पत्रकार परिषदेत घेतला उपक्रमांचा आढावा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे नॅक मूल्यांकन करण्यासाठी १५ ते १७ दरम्यान नॅक पिअर कमिटी येणार आहे. ६ तज्ज्ञांची ही कमिटी रविवारी कोल्हापुरात मुक्कामास येणार आहे. ७० टक्के गुणांकनासाठीचा अहवाल ऑनलाईन सादर केला आहे. नॅक कमिटीसमारे ३० टक्के गुणांसाठी पहिल्यांदा कुलगुरू सादरीकरण करणार आहेत. अभ्यासक्रम, अध्यापन, अध्ययन, संशोधन आदी सात मुद्द्यांवर मूल्यांकन होणार आहे.विद्यापीठ मूल्यांकनासाठी सज्ज असून 'नॅक ए प्लस' मिळवण्याच्या तयारीत आहे. अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिर्के पुढे म्हणाले, शिवाजी विद्यापीठात सोमवार ते बुधवार अशी तीन दिवस नॅक पिअर समिती मूल्यांकन करणार आहे. उदयपूर येथील मोहनलाल सुखाडिया विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. जे. पी. शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली ६ सदस्यीय कमिटी पाहणी करणार आहे. सचिव बेंगलोर डॉ. बी. आर. कौशल. पश्चिम बंगाल येथील

एस. ए. एच. मोनुद्दिन, भटिंडा येथील डॉ. तरूण अरोरा, दिल्ली येथील डॉ. सुनिल कुमार. मेघालय शिलॉंग येथील डॉ. हरिश्चंद्र दास या सदस्यांचा कमिटीमध्ये समावेश आहे. विद्यापीठातील मूलभूत सुविधा, शैक्षणिक उपकरणे, प्रयोग शाळा, ग्रंथालय, विद्यार्थ्यांसाठीच्या सुविधा, विद्यापीठ प्रशासन, कमवा व शिका योजना, पर्यावरणपूरक विद्यापीठ, परिसरातील जैवविविधता, पाणी व्यवस्थापन आदींची पाहणी करणार आहेत. गेल्या दोन महिन्यापासून मूल्यांकनाची तयारी सुरू आहे. १५ ते १६ दरम्यान ३४ पैकी १७ अधिविभागांची पाहणी, विविध घटकांशी संवाद होणार आहे. १७ मार्च रोजी दुपारनंतर सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून नॅक कमिटीला कोल्हापूर संस्कृतीचे दर्शन घडवले जाणार आहे. यावेळी कोरोना प्रतिबंधक नियमाचे पालन केले जाणार आहे.

उपयोजित संशोधनावर भर...

विद्यापीठातील संशोधकांनी गेल्या पाच वर्षात २१ पेटंट मिळवली आहेत. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र यासह अर्थशास्त्र विभागानेही संशोधनाच्या माध्यमातून विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. मूलभूत संशोधनाबरोबर उपयोजित संशोधनावर भर दिला जातो. अधिविभागातील संशोधक विद्यार्थी, प्राध्यापकांना शिष्यवृत्तीही दिली जाते आशी माहिती कुलगुरु डॉ. शिर्के यांनी दिली

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 MAR 2021 लोकमत

नॅक मूल्यांकनासाठी शिवाजी विद्यापीठ सज्ज

डी. टी. शिर्के यांची माहिती; तीन दिवस चालणार प्रक्रिया; ३०० गुणांसाठी मूल्यांकन होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : नॅकच्या मूल्यांकनासाठी शिवाजी विद्यापीठाची पूर्ण तयारी झाली आहे. उद्यापासून तीन दिवस ही प्रक्रिया चालणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

ही सहा सदस्यीय मूल्यांकन समिती रविवारी कोल्हापूरमध्ये दाखल होत आहे. या पार्श्वभूमीवर शनिवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, संगणक विभागप्रमुख डॉ. आर. के. कामत, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आदी उपस्थित होते. डॉ. शिर्के म्हणाले १० डिसेंबर २०१९ रोजी आधीच्या मूल्यांकनाला पाच वर्षे पूर्ण झाली; परंतु कोरोनामुळे हे मूल्यांकन लांबले. मात्र, १००० पैकी आधीच ७०० गुणांसाठी विद्यापीठाची आवश्यक सर्व माहिती ऑनलाइन पाठवण्यात आली आहे. उर्वरित ३०० गुणांसाठी आता हे प्रत्यक्ष मूल्यांकन होणार आहे. मोहनलाल सुखाडिया विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. जे. पी. शर्मा राजस्थान, सदस्य सचिव डॉ. बी. आर. कौशल बेंगलोर, डॉ. एसएएच मुनोद्दीन पश्चिम बंगाल, डॉ. तरुण अरोरा भटिंडा, पंजाब, डॉ. सुनीलकुमार दिल्ली, डॉ. हरीश चंद्रादास मेघालय यांची सहा सदस्यीय समिती हे मूल्यांकन करणार आहे.

विद्यापीठाचे विविध अभ्यासक्रम, अध्यापन, अध्ययन, मूल्यमापन, संशोधन, विस्तार, मूलभूत सुविधा, प्रयोगशाळा, ग्रंथालय, प्रशासन, विविध आदी एकूण ३८ मुद्द्यांच्या आधारे हे मूल्यांकन करण्यात येणार आहे. पहिल्याच दिवशी सुरुवातीला कुलगुरू विद्यापीठाच्या एकूण कामकाजाबाबत सादरीकरण करतील. २४ पैकी निम्म्या अधिविभागांना समिती भेट देणार आहे.

१०० पशू-पक्ष्यांचे फोटो झळकणार

शिवाजी विद्यापीठ हे आता ऑक्सिजन पार्क म्हणून ओळखले जाते. त्यामुळे या परिसरात आढळणाऱ्या १०० पशू-पक्ष्यांची छायाचित्रे आता विद्यापीठ परिसरात लावण्यात येणार आहेत. या ठिकाणी असणारे पशू-पक्षी वैभव आता छायाचित्रांच्या माध्यमातून समोर येणार आहे.

14 MAR 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

'नॅक'साठी तयारी पूर्ण

- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के
- १७ अधिविभागांना देणार भेट

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाचे मूल्यांकन करण्यासाठी सोमवारी सहा सदस्यीय नॅक समिती विद्यापीठाला भेट देणार असून, समितीमार्फत ३४ अधिविभागांपैकी १७ विभागांना प्रत्यक्ष भेट देण्यात येणार आहे. समितीच्या अध्यक्षपदी सुखाडिया विद्यापीठाचे (उदयपूर) माजी कुलगुरू जी. पी. शर्मा, तर सचिवपदी बी. आर. कौशल (बेंगलोर) असणार आहेत, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्र-कुलगुरू पी. एस. पाटील, वित्त व लेखपाल व्ही. टी. पाटील, एन. एस. देशमुख, डॉ. आर. के. कामत उपस्थित होते.

सात निकषांचे पालन

मूल्यांकनाची तयारी पूर्ण केली असून, यासाठी सात प्रमुख निकषांचे पालन आम्ही केले असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी स्पष्ट केले. यामध्ये अभ्यासक्रम, अध्यापन-अध्ययन- मूल्यमापन, संशोधन-विस्तार, मूलभूत सुविधा, विद्यार्थी सुविधा, प्रशासन उपक्रम यावर भर दिला आहे. मूलभूत संशोधनामध्येही विद्यापीठाने चांगली कामगिरी केली असल्याचे कुलगुरूंनी स्पष्ट केले.

कुलगुरू शिर्के म्हणाले, गेल्या वर्षभरापासून नॅक मूल्यांकन प्रक्रियेच्या तयारीमध्ये विद्यापीठ आहे. दोन टप्प्यांत मूल्यांकन होणार आहे. यामध्ये ७० टक्क्यांचे संख्यात्मक मूल्यांकन पूर्ण झाले असून, ३० टक्क्यांचे विश्लेषणात्मक मूल्यांकन समितीमार्फत होणार आहे. सोमवार, दि. १५ रोजी सकाळी ९ वाजता समिती सदस्य विद्यापीठात दाखल होणार आहे. प्रथम माझे ४५ मिनिटांचे सादरीकरण समितीसमोर होणार आहे. त्यानंतर समिती विविध १७ अधिविभागांना भेट देणार असून, आजी-माजी विद्यार्थी, विभागप्रमुख, संशोधक विद्यार्थी यासह विविध अहवाल तपासणी करण्यात येणार आहे.

पुढारी

विद्यापीठात उद्यापासून 'नॅक' मूल्यांकन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाची चौथ्या टप्प्यातील नॅक मूल्यांकनाची प्रक्रिया सोमवार (दि. १५) पासून सुरू होणार आहे. अभ्यासक्रम, अध्यापन, अध्ययन, संशोधन आदी सात मुद्दे मूल्यांकनासाठी विचारात घेतले जाणार आहेत. विद्यापीठ प्रशासनाची तयारी पूर्ण झाली असून, 'ए' प्लस मानांकन मिळविण्यासाठी प्रयत्नशील आहोत, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठात नॅक मूल्यांकनासाठी १५ ते १७ मार्च दरम्यान नॅक बेंगलोरची पिअर टीम येणार आहे. मोहनलाल सुखाडिया विद्यापीठ, उदयपूरचे माजी कुलगुरू डॉ. जे. पी. शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यीय टीम पाहणी करणार आहे. डॉ. बी. आर. कौशल, बेंगलोर हे सदस्य सचिव असतील. टीममध्ये डॉ. एस.ए.एच. मोनुद्दिन, पश्चिम बंगाल; डॉ. तरुण अरोरा, भटिंडा; पंजाब डॉ. सुनिल कुमार, दिल्ली; डॉ. हरिश्चंद्र दास, शिलाँग, मेघालय यांचा समावेश आहे.



शिवाजी विद्यापीठातून...

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, परीक्षा विभागदेखील सादरीकरण करणार आहेत. मूलभूत सुविधा, शिक्षणासाठीची उपकरणे, प्रयोग शाळा, ग्रंथालय, विद्यार्थ्यांसाठीच्या विविध सुविधा, प्रशासन कसे चालते, कमवा व शिका योजना, पर्यावरणपूरक विद्यापीठ, परिसरातील जैवविविधता, पाणी व्यवस्थापन आदींची पाहणी कमिटी करणार आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, अंतर्गत गुणवत्ता व हमी कक्षाचे डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. आर. के. कामत आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 MAR 2021 लोकमत

नियतकालिकांमधून विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळावे

कुलगुरू डी. टी. शिर्के : नियतकालिकांचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विद्यार्थ्यांनी काढलेले चित्र, लेख, त्यांच्या कल्पना, वैज्ञानिक दृष्टिकोन हे नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर त्यांना जो आनंद होतो तो शब्दांमध्ये मांडता येत नाही. त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची प्राथमिक जबाबदारी ही प्रत्येक महाविद्यालयांची असते, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शनिवारी केले.

शिवाजी विद्यापीठात ऑनलाइन आयोजित कराड येथील यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स आणि वेणूताई चव्हाण कॉलेज यांच्या अनुक्रमे 'यशवंत' व 'संगम' नियतकालिकांच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरू शिर्के म्हणाले, महाविद्यालयांनी नियतकालिकांचे प्रकाशन न करणे म्हणजे त्यांच्या विद्यार्थ्यांना व्यक्त होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध न करून देण्यासारखे आहे.

शिवाजी विद्यापीठात शनिवारी ऑनलाइन पद्धतीने आयोजित कार्यक्रमात कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते 'यशवंत' व 'संगम' नियतकालिकांचे प्रकाशन करण्यात आले.

डॉ. ए. व्ही. माळी संपादित यशवंत या नियतकालिकाच्या मुखपृष्ठावर भारत देश जगाला कोरोना प्रतिबंधक लस देण्यासाठी आत्मनिर्भर झाला आहे, हे दाखविले आहे. डॉ. महेंद्र पाटील संपादित संगम नियतकालिकाच्या मुखपृष्ठावर संपूर्ण जगाला कोविडने बांधून टाकलेले आहे आणि हे जोखड काढून टाकण्याची चावी भारत देशाकडे आहे, हे दर्शविले आहे. डॉ. एल. जी. जाधव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एस. बी. केंगार यांनी आभार मानले. यावेळी सर्व अधिकारी उपस्थित होते.

पुढारी

विद्यापीठात मोडी स्क्रिप्ट अभ्यासक्रमाची उद्यापासून प्रवेश प्रक्रिया सुरू

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र, इतिहास अधिविभाग, यांच्यामार्फत सर्टिफिकेट कोर्स इन मोडी स्क्रिप्ट अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सोमवार (दि.१५) पासून सुरू होणार आहे.

शिवपूर्वकाळ ते स्वातंत्र्यकाळापर्यंत प्रशासनाची तसेच दैनंदिन कामकाजासाठी मराठी भाषेबरोबरच मोडी लिपी मुख्य लिपी असल्याने या काळाबाबतचा इतिहास अभ्यासण्यासाठी ही लिपी ज्ञात असल्याशिवाय संशोधन होऊच शकत नाही.

या काळातील कोणत्याही प्रशासकीय नोंदीकरिता लिपी ज्ञात असणे अपरिहार्य आहे. अभ्यासक्रमाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी मिळतील. इच्छुकांनी प्रवेश प्रक्रियेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राच्या समन्वयक डॉ. निलांबरी जगताप यांनी केले आहे.